## अंतिम हुकुमनामा अर्ज क्र. ०७/२०१५
## निशाणी क्र. ३३, ३४ व ३५ खालील एकत्रीत आदेश
## सी.एन.आर.क्र.एम.एच.एस.आय.०६–००१३०७–२०१५

०१. अर्जदारने प्रस्तुत अर्जाद्वारे सामनेवाला क्र. १० यशवंत कृष्णाजी पंडीत यांचे वारस अभिलेखावर आणणेस झालेला विलंब माफ होवून वारसांविरुध्द झालेला अबेटमेंट आदेश रद्द होवून सदर वारसांची याकामी नोंद करणेस परवानगी मागितली आहे. त्यांचे असे कथन आहे की, दि. १०/०५/२०११ रोजी सामनेवाला क्र. १० हे मुंबई येथे मयत झाल्याचे त्यांना बेलिफ रिपोर्टवरुन समजले. त्यानंतर त्यांनी त्यांच्या वारसांची नांवे व पत्ते यांची माहिती घेवून हे अर्ज दाखल केले आहेत. सदर वारसांची नोंद करणेस त्यांच्या कडून जाणुनबुजून निष्काळजीपणा झालेला नाही आणि वारसांची नोंद होणे हे या अर्जाचा गुणदोषावर निर्णय होण्यास आवश्यक आहे. या सर्व कारणास्तव हे तीनही अर्ज मंजूर होण्याची अर्जदारने विनंती केली आहे.

०२. या तीनही अर्जाची नोटीस सामनेवाला क्र. १० यांचे वारस १०(अ) यांना पाठविली असता नोटीस तामील होवून देखील ते याकामी गैरहजर राहीले. सबब त्यांच्याविरुध्द या अर्जाची चौकशी एकतर्फा करणेत आली.

०३. अर्जदारतर्फे विधिज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले.

०४. प्रस्तुतचा मूळ अर्ज अर्जदारने नियमित दिवाणी दावा क्र. ११८/१९९१ मधील प्राथमिक हुकुमनाम्यावरुन अंतिम हुकुमनामा होवून मिळणेकरीता सन २०१५ मध्ये दाखल केलेला आहे. त्यानंतर प्रस्तुत अर्जाची नोटीस सामनेवाला यांना पाठविली असता नि.१२ वरील दि. ०२/०२/२०१६ रोजीच्या बेलिफ अहवालानुसार सदर सामनेवाला हे मयत असल्याचे याकामी कळविणेत आले आहे. त्यानंतर प्रस्तुतचा अर्ज हा दि. २२/०२/२०१७ रोजी दाखल करण्यात आला आहे. सदर सामनेवाला क्र. १० हे मुंबई येथे राहत असल्याचे कारण पाहता अर्जदारास त्यांच्या वारसांची नांवे, पत्ते व मृत्यू दाखला प्राप्त होणेकरीता कालावधी लागून विलंब होणे हे कारण संयुक्तिक वाटते. प्रस्तुतचा अर्ज

अंतिम हुकुमनामा होवून मिळणेकरीता दाखल असल्यामुळे वारसांची नोंद अभिलेखावर झालेस उभय पक्षकारांमधील वाद गुणदोषावर ठरविणेस मदत होईल. या सर्व कारणास्तव अर्ज मंजूर होण्यास पात्र असल्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

-::- **आदेश** -::-

१. अर्जदारचा नि.३३, नि.३४ व नि.३५ वरील अर्ज मंजूर करणेत येत आहेत.

२. सामनेवाला क्र. १० यांचे वारस अभिलेखावर आणणेबाबत झालेला विलंब माफ करणेत येतो आणि अबेटमेंट आदेश रद्द करण्यात येतो.

३. अर्जदाराने नि.३५ वरील अर्जात मागणी केल्याप्रमाणे सामनेवाला क्र. १० यांच्या वारसांबाबत नि.१ मध्ये पुढील तारखेस वा तत्पुर्वी नोंद करुन घ्यावी.

४. मागणी केलेल्या दुरुस्तीचे किरकोळ स्वरुप पाहता अर्जदारला दुरुस्त प्रत दाखल करणेबद्दल मुभा देणेत येत आहे.

Digitally signed by Rupali Rajanikant Bedagkar
Date: 2021.03.04 18:01:11 +0530

(श्रीमती आर.आर.बेडगकर)
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
सावंतवाडी.

दिनांकः-०४/०३/२०२१